भारत सरकार,
वित्त मंत्रालय

कर्ज वसुली न्यायाधिकरण- II

४था मजला, भिखुभाई चेंबर्स कोचरब आश्रम जवळ, पालदी, अहमदाबाद
पिन-३८०००६ फोन क्र. ०७९-२६५७९३४३, टेलि फॅक्स क्र. ०७९-२६५७९३४१
प्रपत्र क्र.१४ (नियमावली ३३(२) पहा)

टीआरसी. क्र.	२५/२०२३	ओ. ए. क्र.	१५५५/२०१८
इंडियन ओव्हरसीज बँक आणि इतर		प्रमाणपत्र धारक बँक	

विरुद्ध

एएमडब्ल्यू ऑटो कंपोनंट लि आणि इतर	प्रमाणपत्र ऋणको

मागणी सूचना

प्रति,

सी.डी. क्र. १: एएमडब्ल्यू ऑटो कंपोनंट लि., कंपनी कायदा, १९५६ च्या अर्थातील एक कंपनी येथे नोंदणीकृत कार्यालय ३४ कि.मी. माइलस्टोन, भुज-भचौ रोड, गावः कनय्याबे, कच्छ, गुजरात-३७०००२०

सी.डी. क्र. २: एशिया मोटरवर्क्स लि., कंपनी कायदा, १९५६ च्या अर्थातील एक कंपनी येथे नोंदणीकृत कार्यालय ३४ कि.मी. माइलस्टोन, भुज-भचौ रोड, गावः कनय्याबे, कच्छ, गुजरात-३७०००२०

सी.डी. क्र.३: एशिया मोटरवर्क्स होल्डिंग लि., कंपनी कायदा, १९५६ च्या अर्थातील एक कंपनी येथे नोंदणीकृत कार्यालय ७वा मजला, टॉवर-आय, इक्वीनॉक्स बिझनेस पार्क पेनिन्सुला टेक्नो पार्क, एल.बी.एस.मार्ग, कुर्ला (प), मुंबई-४०००७०

सी.डी. क्र.४: अनिरूद्ध भुवाळका, निवासी येथे फ्लॅट क्र.५बी, पन्हार, अब्दुल गफार ख्यान रोड, वरळी सी फेस वरळी, मुंबई-४०००१८.

सन्माननीय पीठासिन अधिकारी, कर्ज वसूली न्यायाधिकरण- II अहमदाबाद, यांनी निर्गमित केलेल्या **ओ.ए.क्र.१५५५/२०१८** मधील वसुली प्रमाणपत्रानुसार **रु. ६२२,८१,१७,६०५.४७/- (रुपये सहाशे बावीस कोटी एक्क्याऐंशी लाख सतरा हजार सहाशे पाच आणि सत्तेचाळीस पैसे मात्र)** सह ३०/११/२०१८ रोजीस व्याज आणि ०१/१२/२०१८ पासून पुढील व्याज अधिक तुमच्या विरोधात थकबाकी रु. १,७५,०००.०० चे परिव्यय (वजा वसूली काही असल्यास) ची रक्कम येणे आहे.

तुम्हाला याद्वारे सदर सूचना प्राप्तीपासून १५ दिवसात वरील रक्कम जमा करण्यासाठी बोलाविण्यात येत आहे, कसूरवार ठरल्यास कायदयानुसार वसुली करण्यात येईल

वरील सदर रकमेव्यतिरिक्त तुम्ही भरावयाचे दायित्व :-

(ए) वसूली प्रमाणपत्रानूसार देय असे व्याज आणि परिव्यय.

(बी) सूचनेची बजावणी आणि थकीत रकमेच्या वसुलीकरिता करावयाच्या इतर प्रक्रिया आणि सूचनेच्या संदर्भातील उपार्जित सर्व खर्च, प्रभार आणि परिव्यय.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ०५/०७/२०२४ रोजी दिले.

शिक्का

सही/-
(अनुभा दुबे),
वसुली अधिकारी-I
कर्ज वसुली न्यायाधिकरण-II
अहमदाबाद

पुढील दिनांक: ३०.०७.२०२४

जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येत आहे की खालील स्वाक्षरीदार ॲडव्होकेट हे, खालील परिशिष्टात विशेष विवरणित मालमत्ता जी निर्वेध, विक्रीयोग्य आणि सर्व प्रकारे बोजामुक्त स्वरूपात आहे, संदर्भात व्हिलेज चेंबूर येथील सिंधी इमीग्रेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., मुंबई ४०० ०७१ येथील सीटीएस क्र. १८६ धारक आणि त्यावर उभी असलेल्या इमारतीसह प्लॉट क्र. १४७ धारक पी.आर. कार्ड प्रमाणे मोजमाप ५८४.३० चौ.मी. किंवा जवळपास, जमीनीचे सर्व भाग आणि हिस्सा युक्त मालमत्ता संदर्भात २०३, ईस्टर्न कोर्ट, प्लॉट क्र. १२, द सिंधी इमीग्रेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., वासन मोटर्स समोर, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ पत्ताधारक मालक मेसर्स नीशिव प्रॉपर्टीज, यांचे एकमेव प्रोप्रायटर, श्री संजय जुमानी, मुंबई यांचे माध्यमाने कार्यरत, यांचे नामाधिकाराची पड़ताळणी करीत आहेत.

कोणीही व्यक्ती ज्यांचे सदर मालमत्ता किंवा त्यातील कोणत्याही भाग संदर्भात विक्री, विनिमय, गहाण, लेट, भाडेपट्टा, ग्रहणाधिकार, प्रभार, बक्षीस, वारसाहक्क, शेअर, ताबा, सुविधाधिकार, विश्वस्त, मृत्युपत्र, असाइनमेंट किंवा कोणत्याही स्वरूपातील बोजा किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, नामाधिकार, दावा, मागणी किंवा मिळकत हितसंबंध असतील किंवा तसा दावा असेल तर त्यांना याद्वारे विनंतीपूर्वक कळविण्यात येत आहे की त्यांनी सदरहू सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून १४ दिवसांच्या आत सर्व आवश्यक आणि समर्थनीय कागदोपत्री पुराव्यांसह आपल्या अशा दाव्याची माहिती खालील स्वाक्षरीदारांच्या खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात द्यावी अन्यथा खालील स्वाक्षरीदार अशा कोणत्याही दाव्यास किंवा हितसंबंधास संदर्भित न करता किंवा त्यावर कोणताही विचार न करता नामाधिकार प्रमाणपत्र जारी करण्यासाठी पुढील कार्यवाही करतील आणि दावे किंवा हितसंबंध, जर कोणते असतील तर ते सर्व हेतू आणि उद्देश्यांसाठी सोडून दिले आणि माफ केले असल्याचे मानले जातील.

वरील संदर्भित मालमत्तेचे परिशिष्ट :

मुंबई महानगरपालिका हद्दी क्षेत्र अंतर्गत मुंबई उपनगरच्या जिल्हा आणि उप-जिल्हा नोंदणीकरण मध्ये बृहन्मुंबई मध्ये व्हिलेज चेंबूर येथील द सिंधी इमीग्रेंट्स कोऑपरेटिव्ह सोसायटी लि., चेंबूर, मुंबई ४०० ०७१ येथील सीटीएस क्र. १८६ धारक आणि तेथे उभ्या असलेल्या इमारतीसह प्लॉट क्र. १४७ धारक पी.आर. कार्ड प्रमाणे मोजमाप ५८४.३० चौ.मी. किंवा जवळपासच्या जमीनीचे सर्व भाग आणि हिस्से युक्त मालमत्ता आणि जी खालील प्रमाणे सीमांकित आहे : **उत्तरेस किंवा त्या दिशेने :** हेमू कलानी मार्ग **दक्षिणेस किंवा त्या दिशेने :** सीटीएस क्र. १८५ **पूर्वेस किंवा त्या दिशेने :** बीएमसी रोड **पश्चिमेस किंवा त्या दिशेने :** सीटीएस क्र. १८८

दिनांक :१५/७/२०२४

पत्ता : युसुफ बिल्डिंग, ४था मजलाकार्यालय क्र. ४१८/ए, फ्लोरा फाउंटेनएम जी रोड, मुंबई ४०० ००१

सही/-
ॲड. सिद्धार्थ आर. रोंघे

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

पोस्ट बॉक्स क्र. १०१, बीएसएनएल कार्यालय समोर, चाटी गल्ली, सोलापुर, महाराष्ट्र- ४१३ ००२.
दूर. क्र. ०२१७ २३२३७०५-२३२५८९४
ईमेल - sholap@bankofbaroda.com

कब्जा सूचना
(नियम-८(१)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **बँक ऑफ बडोदा** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सेकंड) ॲक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या **नियम ३** अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **०३/०७/२०१९** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **१) मे. प्लश टेक्सटाईल्स, २) सौ. दिपशिखा सुनिल सिंग यांस सूचनेतील एकुण नमूद रक्कम रु. ७१,२८,१८०.००/- (रूपये एकाहत्तर लाख अठ्ठावीस हजार एकशे ऐंशी मात्र)** या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

संपुर्ण रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता सदर ॲक्टचे कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करुन **११ जुलै, २०२४** रोजी सांकेतिक कब्जा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा बँक ऑफ बडोदा करीता कर्जदार/हमीदार **१) मे. प्लश टेक्सटाईल्स, २) सौ. दिपशिखा सुनिल सिंग यांस सूचनेतील नमुद रक्कम रु. ७१,२८,१८०.००/- (रूपये एकाहत्तर लाख अठ्ठावीस हजार एकशे ऐंशी मात्र) अधिक पुढील व्याज आणि इतर प्रभार इ. च्या भाराअधीन राहील.**

तारण मत्ताच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे कलम (८) च्या तरतुदीनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

मिळकतीचे वर्णन

१) २६० सेमीचे शटललेस रॅपियर लूम चे वायजे ७३७ मॉडेल च्यासह इलेक्ट्रॉनिक डॉबी आणि हेल्ड फ्रेम्स सह इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर आणि स्टँडर्ड ॲक्सेसरीज- दोन मशीन्स येथे प्लॉट क्र. सी९/३, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर-४१३००६.

२) २६० सेमीचे वायजे ७३७ मॉडेलचे रॅपियर लूम च्यासह २६८८ हुक्सचे इलेक्ट्रॉनिक जॅकवार्ड च्यासह इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर आणि स्टँडर्ड ॲक्सेसरीजसह - दोन मशीन्स येथे प्लॉट क्र. सी९/३, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर-४१३००६.

३) २६० सेमीचे शटललेस रॅपियर लूमचे वायजे ७३७ मॉडेल च्यासह इलेक्ट्रॉनिक डॉबी आणि हेल्ड फ्रेम्स सह इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर आणि स्टँडर्ड ॲक्सेसरीज- दोन मशीन्स येथे प्लॉट क्र. सी९/३, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर-४१३००६.

सही/-
दिनांक : ११.०७.२०२४ — **बँक ऑफ बडोदा**
ठिकाण : (सोलापुर) — **सोलापुर मेन शाखा**

सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

CFM thoughtful regeneration

नोंदणीकृत कार्यालय: क्लॉक क्र. ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लब जवळ, सव्हे क्र. ८३५/१+३, एस. जी. हायवे, मकरबा, अहमदाबाद- ३८०००५.
कार्पोरेट कार्यालय: १ला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बलार्ड इस्टेट, मुंबई- ४०००३८.
ईमेल: abhishek.joshi@cfmarc.in आणि tasneem.z@cfmarc.in
संपर्क: ९९७०६५११९४ आणि ८८७९८९०३३६ — **सीआयएन: यु६७१००जीजे२०१५पीटीसी०८३९९४**

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)
(नियम ८(१)) सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२

ज्याअर्थी, **स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक (''एससीबी'') आणि पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (''पीएनबीएचएफएल'')** (यानंतर एकत्रित रित्या ''मूळ धनको'' म्हणून संदर्भित) यांनी अनुक्रमे एकूण **(i) भारू. ३२५,००,००,००० (भारतीय रूपये तीनशे पंचवीस कोटी मात्र) आणि (ii) भारू. २७५,००,००,००० (भारतीय रूपये दोनशे पंच्याहत्तर कोटी मात्र)** पर्यंत पत सुविधा दिल्या होत्या.

पुढे, तुम्हाला माहित आहे की, मूळ धनकोने सिक्युरटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (''सरफेसी अधिनियम'', वेळावेळी सुधारित, पूरक केलेले आणि बदल अनुसार) अंतर्गत एससीबी आणि सीएफएमएआरसी आणि पीएनबीएचएफएल आणि सीएफएमएआरसी दरम्यान अनुक्रमे निष्पादित ३१ मे, २०२४ दिनांकित नोंदणीकृत अभिहस्तांकन करारांतर्गत **सीएफएमएआरसी ट्रस्ट- १४०** चे ट्रस्टी म्हणून कार्यरत सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड **(''सीएफएमएआरसी'')** कडे रेडियस सुमेर डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड कडे देण्यात आलेल्या पत सुविधांमधील संबंधित तारण आणि हमीसह त्यांचे हक्क, नामाधिकार, हितसंबंध अभिहस्तांकन केले आहेत.

निम्नस्वाक्षरीकार सरफेसी अधिनियम अंतर्गत **सीएफएमएआरसी (सीएफएमएआरसी ट्रस्ट- १४० चे ट्रस्टी म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत)** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सरफेसी अधिनियमच्या कलम १३(२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोसमेंट) रूल्स, २००२ अनुसरून मूळ धनकोद्वारे जारी केलेल्या पुढील मागणी सूचनेला अनुसरून **(१) रेडियस सुमेर डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, (२) सुमेर बिल्टकॉप प्रायव्हेट लिमिटेड, (३) श्री. संजय राजकुमार छाब्रिया, अंतरिम निराकरण व्यावसायिक श्री. प्राकुल थाडी मार्फत कार्यरत, (४) श्री. राहुल रमेश शाह, आणि (५) कु. विधी राहुल शाह (यानंतर एकत्रितरित्या ''कर्जदार'' म्हणून संदर्भित)** यांना म्हणजेच (i) रकमेच्या पूर्ण वसुलीच्या तारखेपर्यंत गणना करण्यायोग्य सह **भारू. २८२,८५,८९,६४५.७८ पै. (भारतीय रूपये दोनशे ब्याऐंशी कोटी पंच्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार सहाशे पंचेचाळीस आणि पैसे अठ्ठयाहत्तर मात्र) ६ मार्च, २०२० रोजी** प्रमाणे या रकमेचे संपूर्ण प्रदान मागविणारा पीएनबीएचएफएल द्वारे जारी केलेल्या १ एप्रिल, २०२० दिनांकित मागणी सूचना, आणि (ii) रकमेच्या संपूर्ण वसुलीच्या तारखेपर्यंत गणना करण्यायोग्य सह **भारू. ५२१,१०,५५,५६८.२५ पै. (भारतीय रूपये पाचशे एकवीस कोटी दहा लाख पंचावन्न हजार पाचशे अडुसष्ट आणि पैसे पंचवीस मात्र) २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीप्रमाणे** या रकमेचे संपूर्ण प्रदान मागविणाऱ्या सरफेसी अधिनियमच्या कलम १३(२) अंतर्गत एससीबी द्वारे जारी केलेल्या २७ मार्च, २०२३ दिनांकित मागणी सूचना (यानंतर एकत्रितरित्या ''मागणी सूचना'' म्हणून संदर्भित) संबंधित मागणी सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांत वरील सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यास सांगितले होति.

संबंधित मागणी सूचने अंतर्गत उपरोक्त रक्कम परतफेड करण्यास कर्जदार अयशस्वी ठरल्याने कर्जदार आणि तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी अधिनियम च्या कलम १३ च्या पोट कलम(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फ्रोसमेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून याखालील विवर्णित सांकेतिक मिळकतीचा कब्जा **१२ जुलै, २०२४** रोजीस घेतला.

विशेष करून कर्जदार आणि तमाम जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी व्यवहार करू नये आणि मिळकतीशी कोणताही व्यवहार **३० जून, २०२४** रोजी प्रमाणे **भारू. १०,५१,४३,७७,०८८ (भारतीय रूपये एकशे एकावन्न कोटी त्रेचाळीस लाख सत्त्याहत्तर हजार अठ्ठयाऐंशी मात्र)** (प्रभार, शुल्क इ., कंत्राटी दराने पुढील व्याजासह) या रकमेसाठी सीएफएमएआरसी (सीएफएमएआरसी ट्रस्ट- १४० चे ट्रस्टी म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत) च्या प्रभाराच्या भाराधीन राहील.

कर्जदारांचे लक्ष तारण मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफेसी अधिनियमच्या कलम १३ च्या पोट कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

तारण मत्तेचे विवरण

सुमेर बिल्डकॉर्प प्रायव्हेट लिमिटेड (जमिनीचे मालक म्हणून) आणि रेडियस सुमेर डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (विकासक म्हणून) ची खाली नमूद केलेली मिळकत: मुंबईच्या बेट आणि नोंदणी उप-जिल्हात रे रोड आणि माथर पाखाडी रोड माझगावच्या जंक्शनवर आणि रे रोड येथे स्थित माझगावचा कॅडस्ट्रल सव्हें क्र. ५२५ धारक जमीन, मोजमापित ३८,८८१.५८ चौ. मी. (४६,५०२ चौ. यार्ड) किंवा आसपास चे ते सर्व भाग आणि विभाग. जमीनीवर भारित केलेल्या आणि जेव्हा खरेदी केल्यानुसार हस्तांतरणीय विकास अधिकार (''टीडीआर'') आणि जमीनीच्या संदर्भात विकास हक्क आणि वर्तमान आणि भविष्यातील मजला जागा निर्देशांक (''एफएसआय'') आणि त्यावरील बांधलेली किंवा बांधायची युनिट्स (''युनिट्स''). वगळलेला विभाग वगळून सीमाबध्द: पूर्व आणि दक्षिण पूर्वेकडे किंवा दिशेने: अंशत: रे रोडने; पश्चिमेकडे किंवा त्या दिशेने: अंशत: सर दिनशॉ एम. पेटिटच्या निष्पादकांच्या पूर्वीच्या मालकीची मिळकत आणि सन्माननीय श्री. बायरामजी जीजीभॉय ट्रस्ट सेटलमेंट १८८७ च्या विश्वस्तांच्या मालकीच्या मिळकती द्वारे आणि आता अंशत: वामनराव भाई आणि दुसरे, अंशत: शिवदास चॅम्पसी यांच्या मालकीचे आणि अंशत: वॉलेस फ्लोअर मिल्स लिमिटेड आणि अंशत: लीलाधर हरिराम आणि अंशत: पूर्वी टँक बंदर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिळकतीद्वारे आणि सध्या महोमेदन दफनभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमीनीद्वारे दक्षिण पूर्वेकडे किंवा त्या दिशेला: मातरपाकडी रोड नावाच्या सार्वजनिक रस्त्याने; उत्तरेकडे किंवा त्या दिशेने: पूर्वी टँक बंदर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिळकतीद्वारे, आणि आता महोमेदन दफनभूमी म्हणून ओळखले जाणारे. त्यासह त्यास जोडलेले त्यांच्या मालकीचे त्यांच्या द्वारे वापर, उपभोग, कब्जा असलेल्या कोणत्याही प्रकारे स्थावर मिळकतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागासंबंधित आणि जोडलेले सर्व कंपाऊंड, यार्ड, क्षेत्र, मार्ग, पथ, पॅसेज संबंधित गल्ल्या, झाडे, कुंपण, हेजेस, खड्डे, मार्ग, गटार, नाले, पाणी, जलकुंभ आणि स्थावर मत्ता आणि परिसर किंवा त्यासंबंधी कोणत्याही भागासंदर्भात जोडलेली किंवा उभी आणि बांधलेले याद्वारे स्थापित तारणाच्या मुदती दरम्यान यानंतर कोणत्याही वेळी किंवा सध्याच्या उभ्या, बांधकामित किंवा जोडलेल्या सर्व इमारती, उभारणी, गोदामे आणि त्यासह दुकान/कार्यालये/युनिट्स/अपार्टमेंट्स/फ्लॅट्स/खोल्या/परिसर/क्षेत्राच्या विक्रीला अनुसरून कर्जदार/एसबीपीएल कडे सर्व देय आणि मोबदला मयादे शिवाय समाविष्टीत (दुकान/कार्यालये/युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट्स/खोल्या/क्षेत्र समाविष्टीत) त्यावरील बांधकामित त्यावरील उभे (सध्याचे आणि भविष्यातील) रचना, इमारती सह आणि स्थावर मिळकतीच्या संदर्भात खरेदीदार/पट्टेदार/परवानाधारक किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसह कर्जदार/एसबीपीएल द्वारे निष्पादित किंवा यापुढे निष्पादित होणारे जे काही नावाने संबोधले जाणारे, सर्व करार, व्यवस्था, कंत्राट, दस्तऐवज, रेकॉर्ड, विलेख, कागदपत्रे, लेखन, उपकरण च्या संदर्भात आणि सर्व हक्क आणि स्थावर मिळकतीच्या संदर्भात त्यावरील उपर्जित किंवा उपर्जित होणारे सर्व इतर हक्क आणि फायदा आणि वर्तमान आणि भविष्यातील हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) आणि फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफएसआय) त्यावरील फ्लॅट्स/दुकान/कार्यालये/युनिट्स/अपार्टमेंट्स/क्षेत्र/खोली समाविष्टीत स्थावर मिळकतीवर बांधकामित सर्व वर्तमान आणि भविष्यातील रचना/इमारत आणि स्थावर मिळकतीवर आणि मध्ये कर्जदार/एसपीबीएलच्या कोणत्याही प्रकारे सर्व इस्टेट, हक्क, नामाधिकार, हितसंबंध, मालमत्ता, दावा आणि मागणी.

प्रकल्पाचा भाग असलेला/अंतर्गत १,०७,८२६ चौ. फू. चटई क्षेत्र असलेल्या सुमेर बिल्डकॉर्प प्रायव्हेट लिमिटेडच्या घटकाच्या मर्यादिपर्यंत वगळलेले घटक वगळून मशिदीची जमीन म्हणजेच ३००० चौ. मी. मोजमापित जमीन सह एफएसआय मोजमापित ३४७६.३६ चौ. मी. पुनर्वसन इमारतीत म्हाडा घटक मोजमापित १२९३ चौ. मी. तांबवाला इमारतीच्या भाडेकरूंसाठी पुनर्वसन इमारत मोजमापित ३७०७.२४ चौ. मी. तांबवाला इमारतीचा भाग नसलेल्या इतर भाडेकरूंसाठी पुनर्वसन इमारत मोजमापित ३००.७९ चौ. मी. आयएल ॲण्ड एफएस ट्रस्ट कं. लिमिटेड, विश्वरूप डेव्हलपर्स प्रा. लि. (आता रेडियस सुमेर डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे), निबोध रियल्टी एलएलपी आणि सुरक्षा रियल्टी लिमिटेड दरम्यान निष्पादित अन्य बाबींसह नोंदणी क्र. मुंबई-१/८१०६/२०१५ धारक १०.०७.२०१५ दिनांकित डिबेन्चर्स ट्रस्ट डीड अंतर्गत गहाण ठेवलेले २,००,००० (दोन लाख) चौ. फू. चे विक्रीयोग्य क्षेत्र मर्यादित नसलेल्या २०,००,००० (वीस लाख) चे विक्रीयोग्य क्षेत्राच्या वर सदर जमीनी मधून निर्माण केलेले क्षेत्र.

कृपया हे देखील लक्षात घ्यावे की, ज्या युनिट्ससाठी धनको आणि/किंवा तारण विश्वस्त यांनी तारण मत्तेची विक्री, हस्तांतरण आणि/किंवा विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट आणि/किंवा सशर्त ना-हरकत प्रमाणपत्रे (''एनओसीज'') जारी केल्या असतील आणि जेथे अशा एनओसीच्या अटी संबंधित एनओसी अंतर्गत विहित केलेल्या पद्धतीने पूर्ण केल्या गेल्या आहेत आणि समाधन कारक आहेत, अशा युनिट्सना देखील वगळले जाऊ शकते.

प्रकल्प:- मुंबईतील बेट आणि नोंदणी उपजिल्ह्यातील रे रोड आणि रे रोड आणि माथर पाखाडी रोड, माझगावच्या जंक्शनवर असलेल्या रे रोड येथे स्थित माझगाव येथील कर्जदाराचा निवासी प्रकल्प सह सी. १.०० दशलक्ष चौ.फू.च्या किमान विक्रीयोग्य क्षेत्रासह.

विकास हक्क:-

समाविष्टीत:- (i) प्रकल्प/स्थावर मिळकत अंतर्गत/संबंधित च्या संदर्भात (कर्जदाराचा विकास करारा अंतर्गत समाविष्टीत) सर्व हक्क, नामाधिकार, लाभ आणि हितसंबंध; (ii) प्रकल्प/स्थावर मिळकत च्या संदर्भात ऑफ लोडेड केलेल्या सर्व फ्लोअर स्पेस इंडेक्स इतर अधिकार; आणि (iii) प्रकल्प/स्थावर मिळकत अंतर्गत/संबंधित/च्या संदर्भात (कर्जदाराकडील विकास करारांतर्गत समाविष्टीत) उद्भवणारे/चे विकास आणि इतर सर्व सर्व हक्क, नामाधिकार, लाभ आणि हितसंबंध.

दिनांक :१२-०७-२०२४ — सही/- प्राधिकृत अधिकारी
ठिकाण: मुंबई — **सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. करिता आणि च्या वतीने**
[सीएफएमएआरसी ट्रस्ट- १४० चे विश्वस्त म्हणून आपल्या क्षमतेनुसार कार्यरत]

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आमच्या अशीलांनी आम्हांला मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणी जिल्हा आणि उप जिल्ह्यात ए-१६, नूतन नगर, गुरू नानक रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०००५० येथे स्थित, असलेल्या आणि वसलेल्या एच पश्चिम प्रभाग, गाव बांद्रा, मुंबईचा सीटीएस क्र. एफ-१३६१/ए आणि एफ-१३६१/बी धारक जमीन, मोजमापित ९१३०.५० चौरस मीटर्स किंवा आसपास (**''सदर जमीन''**) चे ते सर्व भाग आणि विभागांकरिता **नूतन नगर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड,** महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी ॲक्ट, १९६० अंतर्गत स्थापित आणि नोंदणीकृत एक सोसायटी, धारक नोंदणी क्र. **बीओएम/एचएसजी/१६५५ सन १९६८** आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय येथे, १६-ए, नूतन नगर प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, गुरू नानक रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०००५० (**''सदर सोसायटी''**) सह नूतन नगर विंग्ज ए, बी, सी, डी, ई, जी आणि एच अशा ज्ञात त्यावरील उभ्या ७ (सात) इमारतीं (**''सदर बिल्डिंग्ज''**) चे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध तपास करण्यास सूचित केले आहे. सदर जमीन याखालील लिखित **पहिल्या परिशिष्टात** अधिक तपशीलवारपणे विवर्णित आणि सदर बिल्डिंग्ज याखालील लिखित **दुसऱ्या परिशिष्टात** अधिक तपशीलवारपणे विवर्णित आहे. सदर जमीन आणि सदर बिल्डिंग्ज यानंतर **''सदर मिळकत''** म्हणून संदर्भित आहे.

सदर सोसायटीने आम्हाला कळविले की, सदर बिल्डिंग्ज मध्ये **१९९** निवासी फ्लॅटस्, **४५** दुकाने, **५७** वाणिज्यिक युनिटस् आणि **११** गॅरेजेस आहेत जे सोसायटीच्या **३१२** सभासदांच्या वहिवाटीत आहेत.

सर्व व्यक्तींना सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही भागांच्या संदर्भात विक्री, हस्तांतर, अभिहस्तांकन, अदलाबदल, करार, प्रभार, भार, कुळवहिवाट, उप-कुळवहिवाट, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, प्रलंबित वाद, परवाना, गहाण, जंगम गहाण, वचन, हमी, सुविधाधिकार, वारसा, हिस्सा, संपादन, विभाजन, भेट, दस्तावेज, धारणाधिकार, देखभाल, अंत्यदान, विश्वस्त, लेखी करार, ताबा, निषेधाज्ञा, कर्ज, अग्रिम, जप्ती, कोणत्याही विश्स्तांतर्गत लेखी करार किंवा लाभकारी हितसंबंध, वहिवाटीचा हक्क किंवा अग्रक्रय अधिकार किंवा विक्रीकरिता कोणताही करार/कंत्राट किंवा इतर व्यवस्था किंवा प्रलंबित वादांतर्गत, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड किंवा कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण यांचा कोणताही डिक्री, हुकूम किंवा निकाल किंवा अन्य कोणत्याहीच्या मार्गे, सदर मिळकतीवर बांधकामित होणारे कोणतेही फ्लॅटस्/परिसर/युनिटस् वर किंवा त्यासंबंधित संभाव्य विकास/टीडीआर समाविष्टीत, कायद्याच्या परिचलनाद्वारे समाविष्टीत कोणत्याही प्रकारे कोणतेही शेअर, हक्क, नामाधिकार, इस्टेट, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास कृपया त्यांनी तसे सदर लिखित स्वरूपात त्याबाबतीत संबंधित कागदोपत्री पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय येथे **मे. वाडिया घांदी ॲण्ड कंपनी, वकील, सॉलिसिटर्स आणि नोटरी, एन. एम. वाडिया इमारत, २रा मजला, १२३, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१** त्यासह ईमेल dhawal.mehta@wadiaghandy.com आणि tanvi.shah@wadiaghandy.com यांना चिन्हांकित एक प्रत सदर तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचना देणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, अशा कोणत्याही तथाकथित हक्क किंवा दाव्यांकडे दुर्लक्ष केले जाईल आणि सोडून दिले किंवा त्यागित केले म्हणून मानण्यात येईल आणि आमचे अशील सदर सोसायटीकडून सदर मिळकतीच्या संपादनासाठी व्यवहार पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करेल.

पहिले परिशिष्ट
(सदर जमिनीचे विवरण)

गाव बांद्रा, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथे स्थित प्लॉट क्र. एफ१३६१/ए आणि एफ१३६१/बी धारक जमीन, मोजमापित सुमारे ९,१३०.५० चौरस मीटर्स, चे ते सर्व भाग आणि विभाग आणि सीमाबद्धता:

उत्तरेला किंवा त्यादिशेने : टर्नर रोड (गुरूनानक रोड)
दक्षिणेला किंवा त्यादिशेने : अंशत: नौपाडा रोड द्वारे आणि सीटीएस क्र. १३६०
पूर्वेला किंवा त्यादिशेने : नौपाडा रोड
पश्चिमेला किंवा त्यादिशेने : सीटीएस क्र. १३५७, १३५६, १३६८

दुसरे परिशिष्ट
(सदर बिल्डिंग्जचे विवरण)

बिल्डिंग ए	तळ + ३ (तीन) मजले	बिल्डिंग ई	तळ + ३ (तीन) मजले
बिल्डिंग बी	तळ + ३ (तीन) मजले	बिल्डिंग जी	तळ + ३ (तीन) मजले
बिल्डिंग सी	तळ + ३ (तीन) मजले	बिल्डिंग एच	तळ + ३ (तीन) मजले
बिल्डिंग डी	तळ + ३ (तीन) मजले		तळ + ३ (तीन) मजले

दिनांकित सदर १५ जुलै, २०२४.

वाडिया घांदी ॲण्ड कं. करिता
तन्वी शाह
भागिदार

जाहीर सूचना

माझ्या अशील सौ. सविता संजय परब यांच्यावतीने सूचना याद्वारे देण्यात येते की, फ्लॅट क्र. बी-१९०५, विघ्नहर्ता सीएचएस लि., महादेव पालव मार्ग, करी रोड, मुंबई ४०००१२ च्या संदर्भातील त्यांच्या नावातील खालील दस्तावेज हे हरवले/गहाळ झाले आहेत आणि ते सापड